लोकमत

# भारतीय व्हिनाईल परिषदेत पीव्हीसी उत्पादनाच्या पर्यावरण पूरकतेवर मार्गदर्शन

## नवीन वर्षातील पहिली परिषद प्लास्टिक नगरी जळगावात उत्साहात




भारतीय व्हिनाईल परिषदेच्या मार्गदर्शनपर परिषदेप्रसंगी उपस्थित जी. के. सक्सेना व अन्य मान्यवर.

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** प्लास्टिक उद्योगातील महत्त्वाचे केंद्र अशी ओळख निर्माण केलेल्या जळगावात भारतीय व्हिनाईल परिषदेची नवीन वर्षातील पहिली परिषद नुकतीच झाली. यामध्ये पीव्हीसी संबंधित उत्पादनांची गुणवत्ता, टिकाऊपणा, उपयुक्तता तसेच पर्यावरण पुरकता या सारख्या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

भारतीय व्हिनाईल परिषदेच्या सर्व सदस्यांना अद्यावत तंत्रज्ञान, बाजाराचा दृष्टीकोन, सांख्यिकी आणि संबंधित माहिती तसेच शाश्वततेवर आधारीत जागतिक उपक्रमांविषयी ज्ञानाचे आदान-प्रदान करण्याचा या परिषदेचा उद्देश असतो. त्यादृष्टीने जळगावात झालेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यात आले.

व्यासपीठावर कुलगुरू प्रा.डॉ.विजय माहेश्वरी, बी.एस.आय.चे चेअरमन हेमंत आडे, सिपेट संभाजीनगरचे चेअरमन ए.के.राव, व्हिनाईल परिषदेचे चेअरमन श्रीकांत दिवाण, जळगाव प्लास्टीक असोसिएशनचे चेअरमन रवींद्र लढ्ढा, जैन इरिगेशन सिस्टीमचे व्हाईस प्रेसिडेंट अनिल मुंगड, रिलायन्स इंडस्ट्रीजचे सिनीयर व्हाईस प्रेसिडेंट पुलिन राजगोर, सुप्रिम इंडस्ट्रीज लि.चे असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट जी. के. सक्सेना यांच्यासह देशभरातून १०० कंपनीतील २०० ते २५० प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रास्ताविक सुप्रिम इंडस्ट्रीज लि.चे असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट जी. के. सक्सेना यांनी केले. यशस्वीतेसाठी अनुप मंडल व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

पीव्हीसी उत्पादनांची स्विकृती तसेच जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये त्याचा वापर वाढवण्यासाठी, गुणवत्ता व सातत्य राखण्यासाठी, तांत्रिक मानके विकसित करण्यासाठी भारतीय व्हिनाईल परिषद वचनबध्द आहे, असे प्रतिपादन व्हिनाईल परिषदेचे चेअरमन श्रीकांत दिवाण यांनी या वेळी केले.